ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

लोकगीतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर



प्रा. अभिमन्यू गेना ओहळ
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
छ. शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.

प्रास्ताविक:

समाजजीवनात लोकसंस्कृतीतील लोकसाहित्याचा म्हणजेच लोकगीत, लोकनाटय, लोकनृत्य या लोकपरंपरांना विशेष महत्व आहे. समाजाचा हा एक महत्त्वा चा भाग आहे. लहानपणी आपण ऐकलेल्या चिऊकाऊच्या गोष्टी, विविध देवदेवतांच्या कथा-गीते, प्रथा-परंपरा या याचाच एक भाग होय. या परंपरा पिढयानपिपढया एका-पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेन चालत आल्या. लोकगीत हा त्याचाच एक भाग. विविण सण समारंभात म्हटली जाणारी गाणी, जात्यावरच्या ओव्या, दैवतगीते, लग्नात म्हटली जाणारी गीते अशी कितीतरी त्यांची रूपे आपणास सांगता येतात. यात मौखिक, परंपरेने हस्तांतरण करताना व्यक्तिपरत्वे बदलही होत असे. तर काही नविन घटना प्रसंगांनाअनुसरुन नव्याने रचली जात. समग्र दलितांचे श्रध्दास्थान म्हणजे दीन दलितांच्या मुक्तीदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे धगधगता अंगार होता. त्यांनी आपले संपूर्ण जीवन दलितांच्या, शोषितांच्या न्याय हक्कासाठी झिजवले. त्यामुळे त्यांचे हे जीवन जोकगीताचा विषय कसा होणार नाही. त्यांच्या जीवनगाथेला आपल्याला जसं जमेल असं अनेक मायमाऊलींनी ओवीबध्द केल. अनेक लोकगीतकारांनी आपल्या लेखनीतून प्रयत्न केला. हीच त्यांची लोकगीतांची संपत्ती माझ्या शोधनिबंधातून मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

स्त्री लोकगीतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

बाबासाहेबांची समग्र दीनदलितांना शोषितांना अज्ञान अंधकाराच्या, जातीपातीच्या गर्तेतून बाहेर काढले. आपले जीवन त्यांच्या न्यायहक्कासाठी समर्पित केले अशा महामानवाचे जीवन समगे दलित समाजाला प्राणप्रिय आहे. त्यामूळे त्यांचा जीवनप्रवास त्यांनी समाजासाठी केलेले लढे, आंदोलन, सत्याग्रह या सर्वांना मायमाऊलींनी आपल्या कवणांचा, ओव्यांचा विषय केला तर त्यात काय नवल. या माऊलींनी विविध गीतातून, ओव्यांतून बाबासाहेबांप्रती असणारा आदर मांडला आहे. अशा काही ओव्या पुढीलप्रमाणे-

बाबासाहेबांनी मनुष्याची प्रगती व्हायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र दिला. सामाजिक विषमता घालवण्यासाठी जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे हा बाबांचा संदेश सांगताना माता भगिनी म्हणतात,

'आरं आरं पोरा घे लिहून शिकून!
बाबासाहेब सांगती विद्या हेच धन!'

बाबासाहेबांनना दीनदलितांनी आपले सर्वस्व मानले होते. ते त्यांच्यात आई आणि बाप अशी दोन्ही रूपे पाहतात. ते पुढीलप्रमाणे

'भीम आमुचा भीमाई, आम्हा माणुसकी देई

त्याच्या नावाचा उस्कारा, तिन्ही लोकांमधी जाई
भीम आमचा भीमाई, आम्हा लाभलेली आई
त्याच्या कुशीत मावेना, आभाळभर मायाबाई'

बाबासाहेबांना सर्वांनी बाप बानले. तसेच ते सर्वांची आईही होते. आई हीच बालपणापासून शिकवण देत असते, योग्य बोलण्याची, योग्य वागण्याची, राहण्याची उपदेश करीत असते तसाच उपदेश बाबासाहेबांनी दीनदलितांना केला होता. कसे रहावे, कसे वागावे, भाषा, राहणीमान, पोशाख कसा असावा या सर्वांचा उपदेश बाबासाहेब आपल्या भाषणांमधून माता माऊलींना देत असते. याची प्रचिती यातून येते. बाबासाहेबांनी १९३५सालीच येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली होती आणि त्याची पार्श्वभूमी अनेक परिषदा घेऊन सभा, संमेलने घेऊन केली व शेवटी १९५६ साली सर्वांना बौध्द धम्माची दिक्षा देऊन बौध्द बनवले. सर्व जुन्या रूढीचा, देवदेवतांचा त्याग करून धम्माप्रमाणे आचरण करण्यास सांगितले होते. याचे वर्णन करताना एक माऊली म्हणते,

"अंबाबाईच्या देवळात बंदी होती महाराला
आमचा देव आमच्यामदी, पहा आंबेडकर बाबाला"

देवदेवतांच्या नादाला लागून आजवर तोटाच झाला. देवाने आजवर कोणाचेही भले केले नाही. हे पुढील ओवीतून दिसते,

"दगडाधोंडयांची अंबाई, बेगडाची भुलाई
तुझ्या नावाच गजर पायी तुडविन बाई
माय माय म्हणता, तू कोणाची अंबामाय
झाली कोणाची भलाई, तु सांग केल काय
वाण्याबामणाच्या नवसा पावली
दिनदुबळयांला माराया धावली"

संत गाडगेबाबा आपल्या किर्तनातून सांगायचे की देव दगडाधोंडयात नाही तर माणसामाणसांत आहे. देवळात फक्त भटाचे पोट भरते बाकी काही नाही. बाबासाहेबांनीही हेच सांगितले होते. हेच वरील ओवीतून स्पष्ट होते. आणखी पुढे याच माऊली म्हणतात,
"देव देव करता, देवान काय दिलं

देवान काय दिल सारं जीन वाया गेलं
आता घालु नका जोहार लागू नका पाया
भीमरावानं लावला बुध्दाचा हा दिवा"

बाबासाहेबांनी बुध्दाचा धम्म दिला आणि सर्व दलितांचे जीवनच बदलून गेले. देव, बुवाबाजी, आत्मा, चमत्कार, अंधश्रध्दा, नवस-सायास या सर्वांना दलित समाजाने आपल्या जीवनातून हद्यपार केले. महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह बाबासाहेबांच्या क्रांतीकार्याला महत्त्वाचा प्रसंग चवदर तळयाचे पाणी पिल्यामुळे दलितांच्या जीवनात काही फरक पडणार नव्हता. परंतु तो एक सवर्ण समाजाला देणे हेच महत्त्वाचे कार्य होते. हा संघर्ष दलितांच्या मनावर का ायमचा कोरला आहे. हा संघर्ष या ओवीतून आला आहे.

"चवदार तळयाच पाणी झालं कशानं लाल
माझ्या भीमानं इथ रगत सांडलं
महाडच पानी मोठ चवदार पानी
त्यावर तेच भीमाचं चंद्राच्या ज्योतीवानी
तळयाच्या पान्यात पेटली भीमज्योत
मानुस पाहती तळयाच्या पाण्यात
चला आयाबायांनो घ्या हातात मशाल
जाऊ आपुन तिथ जिथ पाणी झाल लाल"

बाबासाहेबांच्या या आठवणी दलितांच्या माय माऊलींच्या मनात कायम कोरल्या आहेत. त्या त्यांनी सर्वस्व म्हणून मानल्या आहेत.

बाबासाहेबांबरोबरच माता रमाई ही सबंध दीनदलितांच्य जिव्हाळयाचा, आदराचा विषय. त्यांनी केलेला त्याग हाच बाबासाहेबांच्या कार्यासाठी प्रेरणा होती. हा माता रमाईचा त्याग ओवीतून आला आहे तो पुढीलप्रमाणे-

"माय रमाई गेली, डोळयांच्या आड गेली
गेला उजेड दिव्याचा, बाबा पाहताती खाली
माय रमाई गेली, आता दिसणार नाही
बाबा म्हणे, 'रमा, मी तुझ्यासाठी काही कस केलं नाही
गेला उजेड दिव्यांचा, बाबा पाहतात खाली
माय रमाई माऊली जसं सागराच पानी
दानाचं तेज बाबाच्या मुखावरी, बाब झुरतात मनी
चांदाच चांदन व्हती आभाळाची निळाई
व्हती माता रमाई, माझ्या बाबाची सावली"

माता रमाईने अनेक हालअपेष्टा सहन करून उपाशी तापाशी राहून बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी मदत केली. दागिन्यांचा सोस केला नाही. गोवऱ्या थापून बाबासाहेबांच्या संसारास हातभार लावला. स्वत:च्या आरोग्यापेक्षाही बाबांचे शिक्षाण महत्त्वाचे मानले. म्हणूनच बाबांचे शिक्षण, समाजकार्य पूर्ण होऊ शकले. बाबासाहेबांच्या अथांग कर्तृत्वासाठी रमाईचा त्याग तितकाच महत्त्वपूर्ण आहे. त्यामूळेच माता रमाई हा नेहमीच सर्वांच्या आदराचा विषय राहिला आहे.

समारोप:

लोकगीत ही मौखिक रूपाने परंपरेने चालत आलेली परंपरा यातून मानवी जीवनाची स्त्री-जीवनाची सुख-दू:खाची कहानी मांडली जायची. काळानुरुप त्यात काही प्रमाणात बदल केले जायचे आपले आप्त, भाऊ-बंद, आई-बाप, मामा-काका इतर नातेवाईक यांच्या विषयीच्या गीतांचा प्रामुख्याने उल्लेख यायचा. बाबासाहेबांचे जीवन, कार्य, धर्मांतर या सर्व घटना माता माऊलींनी आपल्या ओवीतून ओवीबध्द केला. अशा कितीतरी माय-माऊलींचे काव्यभांडार त्यांच्याबरोबर संपेल की काय अशी भीती आहे. हे संकलित होऊन त्यावर संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

प्रा. अभिमन्यू गेना ओहळ
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, छ. शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.